**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.५०५/२०२१**
**निशाणी क्रमांक – ४८**

**सरकार तर्फे साक्षीदार क्र.३**
**मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,**
**नाव – शिवाजी नामदेव भोईटे, वय– ६० धंदा – सेवानिवृत्त पी.एस.आय.**
**राहणार – जाधववाडी, ता.फलटण, जि.सातारा**

**साक्षीदार क्रमांक ३ यांचा सरतपास सरकारतर्फे सहाय्यक सरकारी विधीज्ञ श्रीमती ए.बी.पाटील यांचेतर्फे शपथेवर सुरु –**

दि.१५.१२.२०२० मी पो.ठाणे फलटण शहर येथे ए.एस.आय. म्हणून नोकरीस होतो. त्यादिवशी श्रीराम यात्रेनिमित्त फलटणमध्ये बंदोबस्तासाठी कर्तव्यावर असताना, पो.हवालदार ब.नं.१६७० श्री. ठाकुर यांना बातमी मिळाली की, कुरेशीनगर येथील कत्तलखान्यामध्ये पांढऱ्या रंगाच्या पिकअपमध्ये जनावरांचे मांस भरले जात असून, त्याठिकाणी जनावरांची कातडे, शिंगे व इतर अवयव पडलेले असून, काही जनावरे देखील कत्तलीसाठी आणलेली आहेत. त्यानंतर सदर बातमीच्या अनुषंगाने कार्यवाहीसाठी ए.पी.आय.श्री.राऊळ, पो.कॉ.श्री.नितीन चतुरे, व पो.कॉ.श्री.नितीन सुळ यांनी पो.ठाण्यातील ३–४ कर्मचाऱ्यांना बोलवून, सदर बातमीची माहिती दिली. ए.पी.आय.श्री.राऊळ यांनी दोन पंचांना त्याठिकाणी बोलावून, बातमीचा आशय समजावून सांगितला. त्यानंतर सदर बातमीच्या अनुषंगानी आम्ही पंचांसह दोन शासकीय वाहनांनी बातमीच्या ठिकाणी गेलो. त्याठिकाणी रात्री ११.४५ वा.आम्ही छापा टाकला असता, एक पांढऱ्या रंगाची जीप उभी असलेली दिसली. त्यामध्ये जनावरांचे मांस, कातडे व शिंगे भरलेले आम्हाला दिसले. तसेच गीर जातीचे ४ खोंड व इतर ५–६ जनावरे त्याठिकाणी १०X१० च्या रुममध्ये बांधलेली होती. ए.पी.आय.श्री.राऊळ यांनी त्याठिकाणी पंचनामा केला. त्याठिकाणी जनावरांचे मांस कापून, सदर जीपमध्ये भरतांना आरोपी आम्हाला दिसले. ए.पी.आय.श्री.राऊळ यांनी आरोपींच्या ताब्यातील मोबाईल, वायर, हत्यारे, जीप व त्यातील मांस आणि त्याठिकाणी असलेली जनावरे ताब्यात घेवून, आम्ही पो.ठाण्यात आलो. पो.ठाण्यात आल्यानंतर पो.कॉ.श्री.नितीन चतुरे यांनी आरोपींविरुद्ध सदर घटनेची तक्रार दिली. मी आरोपींना पाहिल्यास ओळखू शकतो. आजरोजी आरोपींपैकी ५ जण न्यायालयात हजर आहेत. अन्य आरोपी न्यायालयात हजर नाहीत. (आरोपी क्र.५ च्या वतीने नि.क्र.४७ लगत देण्यात आलेल्या आदेशानुसार त्याची गैरहजेरी माफ करण्यात आलेली आहे. आरोपी क्र.६ व ७ हे न्यायालयत गैरहजर असल्याने, त्यांची संपरीक्षा स्वतंत्र करण्यात आलेली आहे.)

**सरतपास पुर्ण.**

**आरोपींच्या वतीने विधीज्ञ श्री.जे.एम.मेटकरी यांच्या मार्फत सदर साक्षीदाराचा उलटतपास सुरू.**

मला प्रस्तुत खटल्यातील सर्व आरोपींची मला संपूर्ण नावे सांगता येणार नाहीत. घटनास्थळावर त्यावेळी असलेल्या जीपचा नोंदणी क्रमांक मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्याठिकाणी जीप उभी नव्हती, त्यामुळे मला त्याचा नोंदणी क्रमांक सांगता येणार नाही. सदर छाप्याच्यावेळी आमच्यासोबत असलेल्या पंचांची नावे मला सांगता येणार नाहीत. त्याठिकाणी बांधलेली गीरगाईचे खोंड व इतर जनावरे अहमद कुरेशी यांच्या ताब्यात होती. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या सरतपासात कथन केल्याप्रमाणे कुरेशीनगर येथील कत्तलखान्यात आम्ही आमच्या पथकासह छापा टाकलेला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, त्याठिकाणी रात्री ११.४५ वा.आम्ही छापा टाकला असता, एक पांढऱ्या रंगाची जीप उभी असलेली दिसली व त्यामध्ये जनावरांचे मांस, कातडे व शिंगे भरलेले आम्हाला दिसले, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, तसेच गीर जातीचे ४ खोंड व इतर ५–६ जनावरे त्याठिकाणी १० X १० च्या रुममध्ये बांधलेली होती, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्याठिकाणी जनावरांचे मांस कापून सदर मांस जीपमध्ये भरतांना आरोपी आम्हाला दिसले, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, ए.पी.आय.श्री.राऊळ यांनी पंचनामा करुन आरोपींच्या ताब्यातील मोबाईल, वायर, हत्यारे, जीप, त्यातील मांस आणि त्याठिकाणी असलेली जनावरे ताब्यात घेतली, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही पो.ठाण्यात आल्यानंतर पो.कॉ.श्री.नितीन चतुरे यांनी आरोपींविरुद्ध सदर घटनेची तक्रार दिली, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्राणी संरक्षण अंतर्गतच्या केसेसचा कोटा पूर्ण करण्यासाठी आरोपीविरुद्ध पो.ठाण्यात खोटी तक्रार दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या वरिष्ठांच्या सांगण्यावरुन मी आजरोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती.

SHIVAJI N THAPEKAR

Digitally signed by SHIVAJI N THAPEKAR

**स्थळ** : फलटण.

**दिनांक :** १३.०२.२०२५

**(एस. एन. थापेकर)**

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, न्यायालय क्र.६,

फलटण.

सदर जबाब मी टंकलिखित केला.

**(आर.पी.खर्शीकर)**

लघुलेखक